# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बंडगार्डन पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०४/०८/२०१७

बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे अक्षय उर्फ मुंज्याबाबा राजेंद्र वाघमारे, वय २१ वर्षे, रा. दुष्काळ झोपडपट्टी, १३ ताडीवाला रोड, पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ३८/२०१७ दिनांक ०४/०८/२०१७ रोजी एक वर्षा करीता पुणे शहर हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम जखमी करणे, हाताने मारहाण करणे, मृत्युच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह अतिक्रमण करणे, आजन्म कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह अतिक्रमण करणे, दुखापत,हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण करणे, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणण्या-या कृतीने दुखापत पोहचवणे, नुकसान करणे, धमकी देणे, फौजदारीपात्र कट रचणे, बेकायदेशिर जमावाचा सभासद, बेकायदेशिर जमावाला पांगण्याचा आदेश दिला हे माहीत असूनही त्यात सामील होणे, दंगा करणे, समान उदिष्ट साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशिर जमावाचा सभासद, धार्मिकस्थळाचे नुकसान करणे किंवा अपवित्र करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, जबरी चोरी, सामाईक इरादा वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द बंडगार्डन पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रवीण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर हद्दीतून एक वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.